नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**प्रेस नोट**

दिनांक :– 08/12/2023

# टाकळघाट येथील अतुल ज्वेलर्स दुकानदाराला लुटणाऱ्या दोन गुन्हेगारांच्या मुसक्या आवळल्या
## (48,62,540/– रुपये किंमतीचे सोने व चांदीचे दागीने केले हस्तगत)
## (स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीणने केलेली धडाकेबाज कार्यवाही)

बुटीबोरी टाकळघाट बाजारातील अतुल ज्वेलर्सचा मालक श्री अतुल रामकृष्ण शेरेकर हे दि. 02/12/2023 रोजी रात्री 9.00 वाजताचे सुमारास दुकान बंद करुन सोने–चांदीच्या दागीण्याची बॅक घेवून त्यांचे कारने खापरी मोरेश्वर गावी घरी परत असतांना रस्त्यामध्ये दोन अनोळखी युवकांनी सोनाराचे वाहनाला समोरुन दुचाकी वाहनाने धडक देवून थांबवील व त्याच्या डोळयात मिरची पावडर टाकुन सोनाराचे कारमधील सोने–चांदी व नगदी रक्कम असलेली बॅग पळविली होती. यासंबधात पोलीस ठाणे MIDC बोरी येथे जबरी चोरीचा गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर घटनेचे गांभीर्य लक्षत घेवून नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री हर्ष पोद्दार यांनी नागपूरचे उपविभागीय पोलीस अधिकारी श्रीमती पुजा गायकवाड यांना MIDC बोरी आणि बुटीबोरी पोलीसांचे 2 तपास पथके तयार केले. तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे 4 विशेष पथके तयार करुन आरोपी शोध घेवून गुन्हा उघडकीस आणन्याचे आदेश दिले. तपासादरम्यान स्थानिक गुन्हे शाखेच्या विशेष पथकाने नमुद गुन्हयातील दोन्ही अनोळखी आरोपीतांचा शोध सुरु केला. यादरम्यान टाकळघाट ते वर्धा रोड लगतच्या परिसरात आरोपींचा शोधन्यास सुरवात केली. तसेच तांत्रीक पुराव्यांचे आधारे व गोपनिय बातमीदार नेमुन आरोपींचा शोध सुरु केला असता दि. 08/12/2023 रोजी नमुद गुन्हयातील दोन्ही आरोपी राहुलनगर वस्ती, सोमलवाडा येथे एका घरी थांबुन असल्याची माहिती मिळाली. त्यावरुन स्थानिक गुन्हे शाखेच्या विशेष पथकाने राहुल नगर वस्तीतुन 1) कृष्णा उर्फ जॉन तिवडूजी पंचेश्वर वय 27 वर्ष, रा. घर नं. 18, श्रमीक नगर, हनुमान मंदीर जवळ परसोडी तह.जि. नागपूर ह.मु. व्दारा श्रीमती सुशीला महादेव काकडे यांचे घरी किरायाणे राहुल नगर, सोमलवाडा, नागपूर आणि 2) अशोक कोंदू चौधरी वय 24 वर्ष रा. श्रमीक नगर, परसोडी रेल्वचे लाईन जवळ, खापरी तह. जि. नागपूर यांना ताब्यात घेतले. दोन्ही आरोपीची कसून चौकशी करण्यात आली असता त्यांनी सदरचा गुन्हा केल्याचे कबूल करुन गुन्हयात चोरी केलेला मुद्देमाल त्यांचे जवळ असल्याचे सांगीतले. दोन्ही आरोपींकडून सोन्याचे दागीने एकुण वजन 729.700 ग्रॅम किंमती 40,59,120/– रु. आणि चांदीचे दागीने 7,30,000/– रु. तसेच गुन्हयात वापरलेले वाहन मोपेड क्र. MH 31 DF 8234 किं. 50,000/– रु., दोन मोबाईल फोन किं. 20,000/– रु. रोख रक्कम 3420/– रुपये असा एकुण 48,62,540/– रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला.

यातील आरोपी जॉन हा काही दिवसांपुर्वी चोरीच्या प्रकरणात नागपूर कारागृहात बंदीस्थ होता, कारागृहात त्याची ओळख शुभम नावाच्या आरोपीसोबत झाली होती. शुभम याने त्याना सांगीतले होते की, टाकळघाट बाजारातील अतुल ज्वेलर्स चा सोनार दुकानातुन घरी जातेवेळी सोने–चांदीची बॅग सोबत ठेवतो. त्याला लुटले तर मोठा फायदा होईल. जॉन याने कारागृहातुन सुटल्यानंतर त्याचा बालपणीचा मित्र अषोक चौधरी याला शुभम याने दिलेली टिप सांगीतली. दोघांनी मिळून टाकळघाटच्या सोनारला रस्त्यामध्ये लुटन्याची योजना तयार केली. यासाठी जॉन याने ऑक्टोंबर 2023 मध्ये पोलीस स्टेषन प्रतापनगर हद्दीतुन एक दुचाकी वाहन चोरी केले होते. व ते वाहन अषोक याला घटना घडवून आणन्यासाठी दिले होते. सदर वाहनाने अशोक हा सोनाराचे कारला समोरुन धडक देईल व जॉन हा सोनाराचे कारचे मागे राहुन त्याला मदत करण्याचे निमीत्याने संधी साधून सोनाराचे डोळयात मिरची पावडर टाकणार अषी योजना तयार केली. ठरल्याप्रमाणे दोन्ही आरोपींनी दि. 02/12/2023 रोजी टाकळघाट ते खापरी मोरेष्वर मार्गावर सुनसान स्थळी सोनाराची गाडी गाठून अशोक याने गाडीचे समोरुन धडक देवून सोनाराला थांबविले व जॉन याने सोनाराला मदत करण्याचा बहाना करुन त्याचे जवळ आला व मिरची पावडर सोनाराच्या डोळयात फेकून सोनाराच्या कारमधील सोने चांदीची बॅग पळविली. या प्रकरणात स्थानिक गुन्हे शाखेच्या विशेष पथकाने दिवस रात्र परिश्रम करुन व कौशल्यपुर्ण समांतर तपास केला व दोन्ही आरोपींना शोधून काढले तसेच त्यांचेकडून गुन्हयात चोरी गेलेला 100 टक्के मुद्देमाल हस्तगत करुन गुन्हा उघडकिस आणला आहे.

सदर कार्यवाही ही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री हर्ष पोद्दार व अपर पोलीस अधीक्षक डॉ. संदीप पखाले, नागपूर विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी श्रीमती पुजा गायकवाड यांचे मार्गदर्शनात, पोलीस निरीक्षक श्री ओमप्रकाश कोकाटे, श्री महादेव आचरेकर, श्री भिमाजी पाटील, सहा. पोलीस निरीक्षक, राजीव कर्मलवार, पोलीस उपनिरीक्षक आशिष मोरखेडे, बट्टूलाल पांडे, पोलीस हवालदार दिनेश आधापूरे, मिलींद नांदुरकर, विनोद काळे, ईक्बाल शेख, संजय बांते, प्रमोद भोयर, शंकर मडावी, उमेष फुलबेल, किषोर वानखडे, नितेष पिपरोदे, गजेन्द्र चौधरी, अरविंद भगत, मयूर ढेकळे, रोहन डाखोरे, अमृत किनगे, राकेष तालेवार, चालक पोलीस हवालदार अमोल कुथे, पोलीस शिपाई सुमीत बांगडे, आशुतोष लांजेवार तसेच सायबर सेलचे पोलीस उपनिरीक्षक भारत थिटे, नायक सतिश राठोड, स्नेहा ढवळे यांनी पार पाडली. सदर गुन्हयाचा तपासयांचे मार्गदर्शनात सुरु आहे.



## चोरी

**पोलीस स्टेशन काटोल** :– यातील फिर्यादी नामे गोंविदसिंह रतनसिंग पवारवय 19 वर्ष रा. ह. मु. राठी ले आउट व त्याच्या कडे काम करणारा पप्पु सालवी हे दिनांक 6/12/23 रोजी वेळ 11/00 घराला लॉक लावुन गेले होते व ते दोघे परत रात्री 23/00 वा घरी येवुन पाहिले असता दरवाजाचा लॉक तुटलेला दिसला घरात जावुन पाहिले असता घरातील सामान इकडे तिकडे पडलेले दिसले त्यानंतर घरात ठेवलेली पैसाची बॅग बघीतली असता त्यामधील 10000/– रू चोरी गेले तसेच पुजाघर येथे ठेवलेला 5500/– रूपयेचा गल्ला दिसला नाही व घरात 3 किलो बादाम अंदाचे किंमत 1500/– रू असा एकुण 17,000/– रूपये रोखरक्कम व मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरी केल्याने फिर्यादीच्या तोंडी रिपोर्टवरून सदर चा गुन्हा नोंद केला.

सदर प्रकरणी फिर्यादर नामे. ग गोंविदसिंह रतनसिंग पवारवय 19 वर्ष रा. ह. मु. राठी ले आउट काटोल यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे अज्ञात आरोती विरूध्द अपराध क्र. 1416/23 कलम 454,457,380 भादवि अन्वये गुन्हा नोंद केला आहे सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा दलाल ब.नं 1625 मों 9588653904 हे करीत आहे.

## विनयभंग

**पोलीस स्टेशन मौदा** :–यातील फिर्यादी/पिडीता हि दि 7/12/23 चे सांयकाळी 4/30 वा दर शिवनमशीन चा शिकवनी केल्यानंतर पिडीता हि बसस्टॅाप नान्हादेवी येथे गेली व तेथुन रिल्यान्स 4 जी कंपनीमध्ये पाणी पिण्याकरिता जात असता आरोपी नामे राकेष मंगल ढोले वय 26 रा कोपरा ता मौदा हा तिचे मागे जाउन पाठलाग केल्याने फिर्यादीला भिंती निर्माण झाल्याने पिडीतिने तिच्या भावाला बोलवले असता भावाने आरोपीला हटकले तेव्हा आरेपीने शिवीगाळ करून अंगावर धावला. आशा फिर्यादीच्या तोंडी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा नोंद केला.

सदर प्रकरणी फिर्यादीच्या तोंडी रिपोर्ट वरून पो.स्टे. मौदा येथे आरोपी विरूध्द अपराध क्र 1187/23 कलम 354(ड),504 भादवी अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा गौतम मेश्राम ब.न. 169 मो क्र. 9822545169 हे करीत आहे.

# रेती चोरी

**पोलीस स्टेशन खापा** :– यातील नागपूर ग्रामीण जिल्हयातील पोलीस स्टेशन खापा हदीतीन मौजा वाकोडी येथे रेती चोरी ची चोरटी वाहतूक होत असल्या बाबतची गोपणीय माहिती मिळाल्याने पोलीस स्टेषन खापा चे ठाणेदार स.पो.नि. मनोज खडसे यांनी पथक तयार करून वाकोडी येथे एक ट्रॅक्टर रेती भरून येताना दिसले असता त्यास थांबवुन रेतबाबत रॉयल्टी व वाहतुकीचा परवाना विचारला असता नमुद आरोपीजवळ रेतीबाबत रॉयल्टी व वाहतुकीचा परवाना नसल्याचे आढळून आल्याने नमुद आरोपी नामे 1) प्रविण षेशराव केवट वय 29 वर्श 2) राजकुमार अन्नाजी चौधरी वय 37 वर्श 3) रोहीत कैलास केवट वय 20 वर्श 4) हरीश श्रावन केवट वय 27 वर्श सर्व रा वाकोडी चे ताब्यातुन टॅक्टर क एम एच 40 एल 4237 व टॉली क एम एच 40 एल 5584 कीमती 6,00,000/– रूपये व एक ब्रास रेती कि. 4000/– रूपये पावडे टोपले 600/– रूपये असा एकुन 6,04,600/– रूपयाचा माल जप्त करून आरोपी विरूदध सदर प्रकरणी पोलीस स्टेशन खापा येथे अपराध क्रमांक 505/23 कलम 379, 109, 34, भादवि सहकलम 48(8) ज म अधि 3/181 मोवाका अन्वये गुन्हा नोंद केला.

सदर ची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. हर्ष ए. पोद्दार व अपर पोलीस अधीक्षक डॉ. संदिप पखाले , यांच्या मार्गदर्शनात खापा पोलीस स्टेशनचे ठाणेदार सहायक पोलीस निरीक्षक मनोज खडसे व त्यांच्या पथकाणे पार पाडली.

**पोलीस माहीती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण),नागपूर**